मौजे टाकवडे येथे श्री व्यंकटेश  महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे मौजे टाकवडे येथे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन टाकवडे गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ.सविता मनोज चौगुले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी  महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए .माने होते.

यावेळी सौ .सविता मनोज चौगुले यांची व्यक्तिमत्व विकासासाठी आपल्या जीवनात श्रमाचा महत्त्वाचे स्थान आहे त्या श्रमाला सन्मान प्राप्त व्हावा यासाठी अशा शिबिराची ग्रामीण भागात आवश्यकता आहे असे मत व्यक्त केले.गावातील सर्व नागरिकांना या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान कार्यक्रमाचे अध्यक्ष मा . प्राचार्य डॉ. व्ही ए माने यांनी केले .या उद्घाटन प्रसंगी टाकवडे ग्रामपंचायतचे उपसरपंच श्री  बाबासो कदम तसेच सहाय्यक शिक्षक माननीय पुजारी सर ,श्री अजय वळवी व ग्रामस्थ  उपस्थित होते.

सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. डी एस कांबळे यांनी प्रास्ताविक केले तर कार्यक्रम अधिकारी प्रा. ए .आय .बाणदार यांनी आभार व्यक्त केले  या शिबिरात 50 स्वयंसेवकानी सहभाग घेतलेला आहे.




श्री व्यंकटेश महाविद्यालय,
श्री व्यंकटेश महाविद्यालय,